सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २१० • मंगळवार दि.१९ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## औषधी विक्रेत्यांचा उद्या देशव्यापी संप

### औषध पुरवठ्यावर परिणामाची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी- ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या ई फार्मसी कंपन्यांवर बंदी आणावी या व इतर मागण्यांसाठी देशभरातील औषध विक्रेते आणि केमिस्ट संघटनांनी २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. या बंदमुळे रुग्णांमध्ये संभ्रम आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ऑनलाइन औषध विक्री करणाऱ्या ई-फार्मसी कंपन्यां-विरोधात हा बंद पुकारण्यात आला असून देशातील प्रमुख औषध विक्रेता संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. ऑनलाइन औषध विक्रीसाठी स्पष्ट नियमावली नसल्याने अनेक कंपन्या सवलतींचे आमिष दाखवत पान ४ वर

## पेट्रोल-डिझेलच्या दरात सलग दुसऱ्यांदा वाढ

### दरवाढीच्या आगीत महागाईचा भडका?

मुंबई/प्रतिनिधी-अवघ्या चार दिवसांच्या अंतराने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसला आहे. सततच्या दरवाढीमुळे आगामी काळात महागाईच्या आगीचा भडका उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंगळवारपासून लागू झालेल्या नव्या दरानुसार पेट्रोलच्या किंमतीत ९१ पैशांची तर डिझेलच्या दरात ९४ पैशांची वाढ झाली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलमध्ये तब्बल ३ रुपये आणि डिझेलमध्ये ३.११ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा झालेल्या दरवाढीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



आंतरराष्ट्रीय बाजारात इराण-अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे खनिज तेलाच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्याचा परिणाम भारतीय पेट्रोलियम कंपन्यांवर होत असून वाढता आर्थिक भार काही प्रमाणात ग्राहकांवर टाकण्यात आल्याचे चित्र दिसत आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपल्यानंतर लगेचच इंधन दरवाढीचा निर्णय झाल्याने राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पेट्रोलचे दर १०९ रुपयांच्या पुढे गेले असून डिझेलही ९६ रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. विशेष म्हणजे कोकण व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक दर नोंदवले गेले आहेत. आगामी काळात आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता कायम राहिल्यास आणखी दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेजारील गोव्यात पेट्रोलचा दर १०१.२५ तर पान ४ वर

## नांदेडसह मराठवाडा-विदर्भ तापणार

## उन्हाची 'काहिली' अजुन काही दिवस

मुंबई/प्रतिनिधी- विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४३ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता हवामान विभागाच्यावतीने व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः नांदेडसह मराठवाड्यात उष्णतेचा तडाखा अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

राज्यातील वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असून, पुढील काही दिवस महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. नांदेड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून, दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. सकाळीच कडक उन्हाचा चटका जाणवत असून, दुपारी उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होत आहेत. वाढत्या तापमानामुळे शेतकरी, मजूर, वाहन चालक आणि बाहेर काम करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये उष्ण व कोरडे वातावरण कायम राहणार आहे. काही भागांत तापमान ४४ अंशांच्या पुढे जाण्याची शक्यता असून,



नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट अधिक तीव्र झाली असून, काही ठिकाणी तापमानाने ४६ अंशांचा टप्पा गाठला आहे. वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे आणि कोकण किनारपट्टीवर तापमान तुलनेने कमी असले तरी दमट हवामानामुळे उकाड्याची तीव्रता वाढली आहे. पुणे, नाशिक, सातारा आणि कोल्हापूर भागातही दिवसभर कडक पान ४ वर

## शिवराज मोटेगावकर ईडीच्या रडारवर?

### नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आर्थिक व्यवहारांचीही चौकशी होण्याची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी-देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात नाव समोर आल्यानंतर आता शिक्षण क्षेत्रातील चर्चित व्यक्तिमत्त्व शिवराज मोटेगावकर हे अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीच्या रडारवर असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पेपरफुटी प्रकरणाच्या तपासादरम्यान समोर आलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे केंद्रीय यंत्रणांचे लक्ष आता मोटेगावकर यांच्या आर्थिक उलाढालींकडे



वळल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

सीबीआयकडून सुरू असलेल्या तपासात काही संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि संपर्कांची माहिती समोर आल्याचे सांगितले जात आहे. क्लासेस व्यवसायाच्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल उभी करणाऱ्या मोटेगावकर यांच्या मालमत्ता, गुंतवणूक आणि व्यवहारांची माहिती विविध यंत्रणांकडून गोळा केली जात असल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी करण्यात आलेली नाही.तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींशी संबंधित काही आर्थिक व्यवहारांचे पान ४ वर

## राष्ट्रवादीच्या 'रणनीती'कार अरोरांची एक्झिट,प्रशांत किशोरांकडे सूत्रे

मुंबई/प्रतिनिधी-आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या राजकीय रणनीतीत मोठा बदल करत नवे चाणक्य मैदानात उतरवले आहेत. पक्षाच्या प्रचार आणि निवडणूक व्यवस्थापनाची धुरा आता देशातील प्रसिद्ध राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या खांद्यावर सोपविण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सर्वासर्वे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे २७ जानेवारीला निधन झाल्यानंतर पक्षात मोठे फेरबदल सुरु आहेत. त्यातच १९ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि खा.पार्थ पवार यांनी प्रशांत किशोर यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली.या बैठकीत आगामी तीन वर्षांसाठी पक्षाच्या राजकीय रणनीतीबाबत सविस्तर चर्चा झाली. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १ जूनपासून प्रशांत किशोर यांची टीम अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेससाठी काम सुरू करणार असल्याचे सांगितले जात आहे. राजकीय वर्तुळात पीके म्हणून ओळखले जाणारे प्रशांत किशोर यांनी देशातील अनेक निवडणुकांमध्ये यशस्वी रणनीती आखून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या प्रचार मोहिमेपासून त्यांची राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू झाली. त्यानंतर त्यांनी बिहारमध्ये नितीश कुमार, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी, आंध्र प्रदेशात वाय. एस. जगन मोहन रेड्डी, तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन तसेच आम आदमी पार्टी यांच्यासाठी प्रभावी निवडणूक व्यवस्थापन केले आहे. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीनंतर पक्षाला नव्याने उभारी देण्यासाठी डिझाईन बॉक्स या पॉलिटिकल कॅम्पेन मॅनेजमेंट कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. कंपनीचे प्रमुख नरेश अरोरा यांनी अजित पवारांच्या पक्षासाठी गुलाबी कॅम्पेनिंगची संकल्पना राबवली होती. लाडकी बहीण योजनेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार गुलाबी जॅकेटमध्ये दिसू लागले होते. या नव्या प्रतिमेमुळे विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे मानले जाते. राजकीय ब्रँडिंग, संदेश व्यवस्थापन आणि इमेज मेकओव्हरमध्ये नरेश अरोरा यांची खास ओळख होती. राजस्थान, कर्नाटकसह अनेक राज्यांमध्ये त्यांनी काँग्रेससाठी प्रचार मोहिमा यशस्वीपणे हाताळल्या होत्या. मात्र आता पक्षाने आगामी २०२९ च्या निवडणुकांचा विचार करून प्रशांत किशोर यांच्यावर विश्वास दाखवला आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय रणनीतीत मोठा बदल झाल्याचे मानले जात असून, पुढील काळात पक्षाची नव्या पद्धतीने पुनर्बांधणी आणि आक्रमक निवडणूक मोहीम पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शहरातील उड्डाणपुलावर सकाळी ११ नंतर असा शुकशुकाट दिसून येत आहे. प्रमुख रस्त्यांसह गल्ली-बोळातील रस्त्यावरही एका-दुक्का वाहनचालक पहावयास मिळत आहे.

## 'हागणदारी मुक्त गाव' ही घोषणा केवळ फलकांवरच

### हदगाव तालुक्यात उघड्यावर शौच सुरुच;दुर्गंधीमुळे नागरिकांची चिंता वाढली

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये 'हागणदारी मुक्त गाव' ही घोषणा केवळ फलकांवरच (बोर्डांवर) मर्यादित राहिल्याचे चित्र असून, वास्तव मात्र याच्या अगदी उलट आहे. तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागांत आजही नागरिक मोठ्या प्रमाणावर उघड्यावर शौचास जात असल्याचे विदारक दृश्य पाहायला मिळत आहे.

गावांच्या मुख्य रस्त्यांवर पसरलेल्या तीव्र दुर्गंधीमुळे वाटसरूंना नाक दाबूनच ये-जा करावी लागत आहे. कागदावरच 'स्वच्छ भारत अभियान' हदगाव तालुक्यातील १२० हून अधिक गावांपैकी अनेक ठिकाणी स्वच्छ भारत अभियान फक्त कागदावरच जिवंत असल्याचे दिसून येते. अनेक गावकऱ्यांनी शौचालय बांधणीसाठी शासकीय योजनांचा लाभ तर घेतला, परंतु त्याचा प्रत्यक्ष वापर होताना दिसत नाही. काही ठिकाणी अद्याप शौचालये बांधलीच गेलेली नाहीत, तर ज्या ठिकाणी ती बांधली आहेत, तिथे त्यांना कुलूप लावलेले पाहायला मिळत आहे.काही नागरिकांनी आरोप केला आहे की, आम्हाला या योजनेचा कोणताही लाभ मिळाला नाही, तर काही ठिकाणी केवळ कागदोपत्री पूर्तता करून काम पूर्ण दाखवण्यात आले आहे. याचा परिणाम म्हणून आजही गावातील मुख्य रस्त्यांच्या कडेला पहाटेच्या वेळी नागरिक उघड्यावर बसलेले आढळून येत आहे.

**'गुड मॉर्निंग पथक' गायब?**

दुर्गंधीमुळे वाढणारा आजारांचा धोका लक्षात घेता, प्रशासनाने आता जनजागृती मोहीम तीव्र करण्याची गरज निर्माण झाली आहे. पूर्वी राबवली जाणारी 'गुड मॉर्निंग स्क्वॉड' (पहाटेची गस्त पथके) सारखी मोहीम पान ४ वर

## दीड पिढ्यांचा कडाडून विरोध;दीड वर्षांत प्रचार!



नांदेड-राजकारणात विचारधारा ही आता कायमस्वरूपी गोष्ट राहिलेली नाही. पूर्वी विचारांसाठी लोक पक्ष बदलत असत; आता पक्ष बदलल्यावर विचार बदलतात. फरक इतकाच की, आधी कपडे बदलल्यावर माणूस बदलल्यासारखा वाटायचा, आता पक्ष बदलल्यावर विचारसुद्धा बदलून जातात. महाराष्ट्राच्या राजकारणात अशोक चव्हाण यांच्या प्रवासाने या सिद्धांताला अगदी प्रयोगशाळेतील प्रमाणपत्र मिळवून दिले आहे.

माजी केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यात संघ आणि भाजपच्या विचारांचा विरोध केला. विरोध म्हणजे उगाच सभा घेऊन घोषणा देणे नव्हे, तर विचारांच्या पातळीवर संघर्ष करणे. त्यांचा विरोध सभ्य होता. विरोधकांचा सन्मान राखत त्यांनी आपली भूमिका मांडली. आयुष्यात एकदा काँग्रेसविरोधात त्यांनी बंड केले, पण तोही प्रयोग फार काळ टिकला नाही. पुन्हा काँग्रेसमध्ये परत आले आणि शेवटपर्यंत त्याच विचारधारेसोबत राहिले.

**दृष्टीक्षेप**
**प्रदीप नागापूरकर**

पुढे अशोक चव्हाण आले. त्यांनीही आपल्या राजकीय आयुष्याचा मोठा भाग संघ-भाजपविरोधात घालवला. कितीतरी विधानसभा, लोकसभा निवडणुका काँग्रेसच्या तिकिटावर लढवल्या. दोनदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही झाले. त्यावेळी भाजपवर टीका करण्याचा त्यांचा अनुभव इतका पक्का झाला होता की, भाषणात भाजपवर आरोप नसतील तर कार्यकर्त्यांनाही संशय यायचा 'आज साहेबांची तब्येत ठीक आहे ना?'

नंतर अचानक राजकीय वातावरण बदलले. लोकसभा निवडणुकीच्या आधी ते भाजपमध्ये जाणार अशा चर्चा सुरू झाल्या. त्या अफवा असल्याचे त्यांनी इतक्या ठामपणे सांगितले की, लोकांनी त्या चर्चाच बंद केल्या. पण राजकारणात एक नियम आहे.जितका जास्त इन्कार, तितकीच शक्यता अधिक! आणि मग अचानक एका सकाळी कळले की, साहेब भाजपमध्ये दाखल झाले.

सुरुवातीचा काळ साहेबांसाठी कठीण होता. अनेक वर्षे विरोध केलेल्या घोषणांशी जुळवून घ्यायला वेळ लागणारच. 'जय श्रीराम' म्हणताना सुरुवातीला जरा संकोच होत असेल. जणू शाळेत मराठी माध्यमातून शिकलेला विद्यार्थी अचानक इंग्रजी माध्यमात गेला आणि पहिल्या दिवशी 'गुड मॉर्निंग' म्हणताना अडखळतो, तसं काहीसं!

मात्र राजकारण ही एक महान प्रशिक्षण संस्था आहे. येथे सर्वकाही शिकवले जाते. सुरुवातीला जीभ अडखळते, नंतर घोषणा तोंडपाठ होतात आणि मग एक दिवस स्वतःच इतरांना शिकवण्याची वेळ येते.आता नांदेडमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे आणि त्यात अशोक चव्हाण कार्यकर्त्यांना सांगत आहेत की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांचा मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार करा.

हे ऐकून जुन्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनात नक्कीच गोंधळ झाला असेल. काहींना तर असे वाटले असेल की आपण चुकीच्या सभागृहात आलो आहोत का? कारण ज्या विचारांच्या विरोधात दीड पिढ्या संघर्ष करत होत्या, त्याच विचारांच्या प्रचाराची जबाबदारी आता स्वतः घराण्याच्या वारसाने घेतली आहे.

पूर्वी लोक म्हणायचे, 'विचारांसाठी राजकारण करा.' पण आता काळ बदलला आहे. आता कदाचित राजकारणाचा नवा मंत्र तयार झाला असावा 'सत्तेसाठी राजकारण करा.' विचारधारा, भूमिका, घोषणा आणि भाषणे ही सर्व प्रवासातील स्टेशनं आहेत; अंतिम गंतव्य मात्र सत्ता असते. बाकी विचारांचा प्रश्न आला तर तेही काळानुसार 'अपडेट' होतच असतात.

# वरवरची कारवाई नव्हे,मुळावर घाव हवा!

**देशातील स्पर्धा परीक्षा व्यवस्था ही लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी जोडलेली असते. विशेषतः वैद्यकीय शिक्षणासाठी होणारी राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा (नीट) ही परीक्षा विद्यार्थ्यांसाठी केवळ एक परीक्षा नसून अनेक वर्षांच्या परिश्रमांचे, संघर्षाचे आणि स्वप्नांचे केंद्र असते. त्यामुळे या परीक्षेच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब ठरते. दुर्दैवाने, नीट परीक्षेबाबत निर्माण झालेले वाद आणि पेपरफुटीची प्रकरणे आता केवळ एकदाच घडलेल्या घटनांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. २०२४ मधील नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरात मोठी खळबळ उडवून दिली होती. लाखो विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी घेतलेले परिश्रम, त्यांचे पालक आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास यावर या प्रकरणाने मोठा आघात केला. त्या वेळी विविध राज्यांत तपास सुरू झाला, काही आरोपींना अटक करण्यात आली आणि पेपरफुटीचे जाळे व्यापक असल्याच्या चर्चाही समोर आल्या. त्या प्रकरणामुळे देशभरात परीक्षा सुरक्षेविषयी मोठे प्रश्न उपस्थित झाले होते. परंतु २०२६ मध्ये पुन्हा समोर आलेल्या नीटसंबंधित प्रकरणाने अधिक गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. जर २०२४ च्या घटनेतून धडा घेतला गेला असता, तर पुन्हा अशा प्रकारच्या संशयास्पद घटना आणि तपासाची वेळ का आली? यामुळे केवळ व्यक्ती नव्हे तर संपूर्ण यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका घटनेला अपवाद म्हणता येते; परंतु सलग दोन काळात परीक्षा व्यवस्थेभोवती संशयाचे वातावरण निर्माण होत असेल, तर व्यवस्थेच्या मूळ रचनेकडे पाहण्याची गरज आहे.या प्रकरणात पी. व्ही. कुलकर्णी, प्राध्यापक शिवराज मोठेगावकर, मांढरे मॅडम आणि इतर संबंधितांविरुद्ध कारवाई झाल्याची माहिती समोर आली आहे. तपास सुरू असून संबंधित यंत्रणा आपले काम करत आहेत. मात्र येथे प्रश्न असा आहे की, काही व्यक्तींना अटक झाली म्हणजे संपूर्ण प्रकरणाचा शेवट झाला असे मानायचे का? राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा ही एका व्यक्तीच्या हातात चालणारी प्रक्रिया नसते. प्रश्नपत्रिका तयार करणे, मॉडरेशन, गोपनीयता राखणे, सुरक्षित व्यवस्थापन, वितरण आणि परीक्षा नियंत्रण अशी अनेक स्तरांवरील साखळी यात कार्यरत असते. अशा परिस्थितीत जर प्रश्नपत्रिका बाहेर पडत असेल, तर केवळ शेवटच्या टप्प्यावर आढळलेल्या व्यक्तींवर जबाबदारी टाकून चालणार नाही. सध्या या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडून सुरू आहे. हा तपास सखोल झाला पाहिजे. वरवरच्या स्तरावरील कारवाई पुरेशी ठरणार नाही. काही व्यक्तींना अटक करणे आणि संपूर्ण व्यवस्थेतील दोष शोधणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. जर या प्रकरणाच्या मुळावर घाव घालायचा असेल, तर प्रश्नपत्रिकेच्या निर्मितीपासून अंतिम व्यवस्थापनापर्यंत संपूर्ण प्रक्रियेची चौकशी झाली पाहिजे. येथे एक बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे की, कोणालाही तपास पूर्ण होण्यापूर्वी दोषी ठरवणे योग्य नाही. परंतु तपासाची व्याप्ती व्यापक असली पाहिजे. परीक्षा नियंत्रक, गोपनीयता राखणाऱ्या समित्या आणि प्रश्नपत्रिका हाताळणाऱ्या विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांची भूमिका देखील तपासाच्या कक्षेत येणे आवश्यक आहे. एखाद्या पदावर असणे म्हणजे दोषी असणे नव्हे; परंतु ज्या व्यवस्थेकडे गोपनीयतेची जबाबदारी होती, त्या व्यवस्थेतील प्रत्येक स्तराची चौकशी होणे गरजेचे आहे.आज देशातील लाखो विद्यार्थी आणि पालक एका प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत २०२४ मध्ये धडा मिळाला असताना २०२६ मध्ये पुन्हा अशी वेळ का आली? या प्रश्नाचे उत्तर केवळ काही आरोपींना शिक्षा देऊन मिळणार नाही. त्यासाठी संपूर्ण व्यवस्थेच्या मुळाशी जाऊन दोष शोधावे लागतील.कारण शेवटी प्रश्न केवळ पेपरफुटीचा नाही; तो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, त्यांच्या विश्वासाचा आणि देशातील परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा आहे.**

# देशाच्या भवितव्याचा खेळ करणारे हे धंदे बंद झाले पाहिजेत




**विनायक एकबोटे**
ज्येष्ठ पत्रकार,नांदेड

नीट पेपर फुट प्रकरणामुळे राज्यातील कोचिंग क्लासेसचे बिंग फुटले आहे. आरआरसीचे संचालक शिवराज मोटेगावकर यांच्या अटकेमुळे कोचिंग क्लासच्या नावावर राज्यात काय काय धंदे सुरु होते हेही आता उघड झाले आहे. शासनाचे सर्व शैक्षणिक कायदे, नियम धाब्यावर बसवून राज्यात कोचिंग क्लासेसचे धंदे दिवसा ढवळ्या सुरु होते. तथापि यातून मिळणा-या अब्जावधी रुपयामुळे राजकारण्यापासून ते वृत्तपत्रापर्यत सर्वानाच आर्थिक लाभ होत असल्यामुळे याविरोधात आजवर कोणीही अवाक्षरही काढले नाही. परंतु आता याची सर्व काळी बाजू समोर आल्याने कोचिंग क्लासेस बंद करावे अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

आपला पाल्य चांगला सुशिक्षित व्हावा, समाजात त्याला प्रतिष्ठा मिळावी अशी प्रत्येक पालकांची इच्छा असते. त्यामुळे मुलाचे उज्वल भवितव्य घडविण्याचा प्रत्येक पालकांचा प्रयत्न असतो. पालकांची हीच मानसिकता लक्षात घेऊन कोचिंग क्लासेसचा व्यवसाय सुरु झाला. वास्तविक शाळा, कॉंलेजात जाणा-या प्रत्येक विद्यार्थ्याला तिथेच सर्व ज्ञान मिळावे अशी अपेक्षा असते. परंतु आपला मुलगा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण व्हावा या लालसेपोटी पालक मग विशेष प्रयत्न करतात. त्यासाठी मग मुलाला कोचिंग क्लासेस सारख्या डमी शाळेत पाठविले जाते. त्यासाठी मग कोचिंग क्लाससाठी संचालक लाखो रुपयाची फी वसूल करतात. आता कोचिंग क्लासमध्ये स्पर्धा परिक्षेसाठी होणा-या परिक्षेची तयारी करुन घेतली जाते असा प्रत्येकाचा अंदाज असतो. परंतु हा अंदाज आता घडणा-या घटनांनी खोटा ठरविला आहे. तिथेही मुलाला असामान्य श्रेणीत आणण्यासाठी काय केले जाते हे सीबीआयच्या तपासात काही प्रमाणात उघड झाले आहेच, अजून पूर्ण सत्य पुढील तपासात उघड येईल. परंतु हे कोचिंग क्लासेस केवळ पेपर फुटीसाठीच जबाबदार नसून यांच्यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये इतरही बेकायदेशीर कामे होतात.

शैक्षणिक क्षेत्राचा एक नियम आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शाळा किंवा महाविद्यालयात वर्षातून किमान ७५ ते ८० टक्के हजेरी लावावी लागते. त्याशिवाय त्याला वार्षिक परिक्षेला बसता येत नाही. गंमत बघा लातूर, नांदेड इथल्या कोचिंग क्लास मध्ये केवळ त्या जिल्ह्यातीलच नाही तर विदर्भाच्या वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आदि जिल्ह्यातील विद्यार्थी हजारोंच्या संख्येने प्रवेश घेतात. या शिवाय मराठवाड्यातील हिंगोली, परभणी, धाराशिव आदि जिल्ह्यातील विद्यार्थीही प्रवेश घेतात. हजारोंच्या संख्येने हे विद्यार्थी येथे राहतात. त्यांच्या राहण्यासाठी इतर होस्टेल तर उघडले आहेतच. त्याशिवाय इतरही नागरिकांनी विद्याध्यांना राहण्यासाठी छोट्या छोट्या रुम बांधल्या त्यातून त्यांना भाडे मिळू लागले. याशिवाय विद्य्ाध्र्यांना जेवण्यासाठी अनेकांनी मेस सुरु केल्या. एक गोष्ट मान्य केली पाहिजेत की, कोचिंग क्लासेमुळे अनेकांना व्यवसाय मिळाले, त्यातून आमदनी सुरु झाली. परंतु दुसरी बाजू अशी की, जे विद्य्ाार्धी या कोचिंग क्लास मध्ये प्रवेश घेत असत ते त्यांची अकरावी, बारावी अशी दोन वर्ष येथेच मुक्कामाल राहत असत. मग ते त्यांच्या मुळ शाळा, कॉंलेजात कधी जात असत. कारण एकच विद्यार्धी एकाच दिवशी कोचिंग क्लास आणि शाळेतही हजर तर राहू शकत नाही.यावरही पालकांनी मार्ग काढला. खेड्यापाड्यातील एखाद्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात पाल्याचा नाममात्र प्रवेश घेत असत. तिथे त्यांची ते हजर नसतानाही त्या शाळा, महाविद्यालयातल हजेरी लावली जाते. फक्त वार्षिक परिक्षेलाच हे विद्यार्थी त्या संस्थेचे तोंड पाहतात.

आता प्रश्न असा आहे की, जे शाळा, कॉंलेजेस विद्य्ाार्थी हजर नसतानाही त्यांची हजेरी मांडतात त्या संस्था कशा चालत असतील विचार करा. आपण बेकायदेशीर काम करीत आहोत याची जराही खंत अशा शाळा, महाविद्यालयांना वाटत नाही का? बरं या संस्था कायदेशीर मार्गाने चालत आहेत की नाही हे पाहण्याचे काम ज्यांच्याकडे आहे ते शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, बीडीओ हे सर्व कसे खपवून घेतात? दुसरा महत्वाचा भाग म्हणजे ज्या संस्थात असे बोगस विद्य्ाार्थी भरलेले आहेत त्या शाळेतील शिक्षक हे सर्व कसे खपवून घेतात? किंवा विद्यार्थी नसतानाही त्यांचा पगार बिनदिक्कत सुरु राहतो? कोणत्याही शिक्षण संस्थेला विद्यार्थ्यांच्या संख्येवरुन शासनाकडून अनुदान मिळते. तसेच त्यांच्या शैक्षणिक तुकड्यांना मान्यता मिळते. मग अशा संस्थातील विद्यार्थी जर कोचिंग क्लासेसला प्रवेश घेऊन दोन-दोन वर्ष नांदेड-लातूरला राहत असतील तर त्या संस्थांना अनुदान देताना शासनाकडून काहीही पाहणी केली जात नाही का? आणि सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आजमितीला प्रत्येक शिक्षकाला सातव्या वेतन आयोगानुसार भरघोस, वेतन दिले जाते. अनेक शिक्षकांना तर लाखाच्या वर पगार आहे. एवढा पगार मिळूनही जर विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घ्यावा लागत असेल तर हे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात काय? यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, कोचिंग क्लासेसचा व्यावसाय हा भ्रष्टाचाराची एक मोठी साखळी आहे. शाळेतील शिक्षकापासून तर संस्थाचालक, राजकीय नेते, शासनातील अधिकारी हे सर्व जण या साखळीत जोडले गेले आहेत. त्या शिवाय दिवसाढवळ्या कायदे धाब्यावर बसवून एवढा उघड व्यवसाय चालू शकत नाही.

राहता राहिला भाग पेपर फुटीचा. यासारखे गंभीर दुसरे काही असू शकत नाही. जे विद्यार्थी अशा पध्दतीने परिक्षेच्या अगोदरच पैसे देऊन पेपर घेत असतील त्या विद्यार्थ्यांच्या गुणाची टक्केवारी भलेही वाढत असेल. बुध्दीमत्तेचा काय? कोणाचीही बुध्दी पैशाने वाढली असे आजवर विज्ञानाने सिध्द झालेले नाही. मग अशा प्रयत्नातून पास झालेले विद्यार्थी कसे डॉंक्टर होतील, कसे इंजिनियर होतील याचा विचार विद्यार्थ्यांनी नाही तर त्यांच्या पालकांनीही करायला पाहिजे. अशा विद्यार्थ्यांच्या भरवंशावर देशाचे भवितव्य काय असेल याचा विचार पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही करायला पाहिजेत. पुढच्या पिढीला आपण काय शिकवण देत आहोत याची जरा तरी खंत सर्वानी बाळगणे गरजेचे आहे. त्यामुळे पेपर फुटीच्या प्रकरणात कोणतेही राजकारण न आणता हा तपास सत्याधारित झाला पाहिजेत. यातील जे कोणी दोषी असतील त्यांना कडक शासन झाले पाहिजेत. जेणेकरुन भविष्यात विद्यार्थ्यांच्या आणि देशाच्या भवितव्याशी केवळ पैशाच्या लोभाने असा खेळ कोणी करणार नाही. खरं म्हणजे सर्वानाच लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. रतन खत्रीच्या मटक्याचा आकडा आजवर कधीही लिक झाला नाही, भल्याभल्यांनी अंदाज बांधले पण त्यात त्यांना यश आले नाही. परंतु स्पर्धा परिक्षेचे पेपर मात्र दरवर्षी फुटतात. दरवर्षी हे आरोप होतात. याचा अर्थ शासनापेक्षाही रतन खत्रीकडे अत्यंत प्रामाणिक माणसं आहेत. आपण त्यांच्या पेक्षाही गये गुजरे आहोत.

# पदावर महिला;कारभार मात्र पतींच्याच हाती

माहूर/प्रतिनिधी-महिला सक्षमीकरणाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष वास्तव यात मोठी दरी असल्याचे चित्र माहूर तालुक्यात पाहायला मिळत आहे. शासनाने महिलांना राजकारण व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देऊन नेतृत्वाची संधी उपलब्ध करून दिली असली,तरी अनेक ठिकाणी महिला लोकप्रतिनिधींना केवळ नावापुरते पद देऊन प्रत्यक्ष कारभार त्यांच्या पतींकडूनच चालवला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत, नगरपंचायत तसेच विविध सहकारी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिला पदाधिकारी निवडून आल्या आहेत. मात्र, कार्यालयीन निर्णय, बैठका, आर्थिक व्यवहार, अधिकृत कागदपत्रे आणि प्रशासनिक कामकाजामध्ये महिलांऐवजी त्यांच्या पतींचाच वाढता हस्तक्षेप दिसून येत आहे. अनेक ठिकाणी महिला पदाधिकाऱ्यांच्या नावाने त्यांच्या पतींकडून स्वाक्षऱ्या केल्या जात असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. महिला प्रतिनिधींना केवळ औपचारिक कार्यक्रम, सरकारी बैठका किंवा सार्वजनिक समारंभांपुरतेच मर्यादित ठेवले जात असल्याची टीका होत आहे. प्रत्यक्षात सर्व निर्णय तथाकथित पती प्रतिनिधी घेत असल्याने महिला सक्षमीकरणाचा मूळ उद्देशच धुळीस मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी तर महिला पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरही त्यांच्या पतींकडून अधिकार गाजवण्याचे प्रकार सुरू असल्याचे समोर येत आहे. राजकीय आरक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले जात असताना, काही ठिकाणी त्याचाच राजकीय फायद्यासाठी वापर होत असल्याचे चित्र आहे. महिलांना निवडणुकीत उमेदवारी देऊन सत्ता मात्र पुरुषांनीच आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. परिणामी महिलांना निर्णय प्रक्रियेपासून दूर ठेवून पुरुषसत्ताक मानसिकतेलाच बळ दिले जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.याचबरोबर महिलांसाठी घेण्यात येणाऱ्या विशेष ग्रामसभांचीदेखील अवस्था चिंताजनक बनली आहे. तालुक्यात अनेक गावांमध्ये महिला ग्रामसभा केवळ कागदोपत्री सोपस्कार ठरत असल्याची ओरड होत आहे. महिलांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी आणि गरजा थेट निर्णय प्रक्रियेत याव्यात, हा उद्देश असताना प्रत्यक्षात अनेक महिलांना ग्रामसभेची माहितीच दिली जात नसल्याचा आरोप होत आहे. ग्रामपंचायत कायद्यानुसार दरवर्षी किमान सहा ग्रामसभा घेणे बंधनकारक असून, १४ ऑगस्ट रोजी महिलांसाठी विशेष ग्रामसभा घेण्याचा शासन निर्णय आहे. या ग्रामसभांमधून महिलांना आरोग्य, शिक्षण, पाणीटंचाई, स्वच्छता, सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर थेट मते मांडण्याची संधी मिळणे अपेक्षित आहे. मात्र, अनेक गावांमध्ये ग्रामसभा यशस्वी झाल्याचे दाखवण्यासाठी केवळ फोटोसेशन करून बनावट अहवाल सादर केले जात असल्याची चर्चा आहे.

काही ठिकाणी सरपंच, सचिव आणि मोजक्याच महिलांना बोलावून ग्रामसभा पार पडल्याचे दाखवले जाते. महिला सदस्यांनादेखील विशेष ग्रामसभेची माहिती न दिल्याने त्यांचा सहभाग फक्त सहीपुरता मर्यादित राहत असल्याची खंत व्यक्त होत आहे. परिणामी महिलांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा, ठोस ठराव आणि अंमलबजावणी या बाबी पूर्णपणे दुर्लक्षित राहत आहेत. महिला लोकप्रतिनिधींना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळावी, त्यांच्या अधिकारांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप थांबवावा आणि सरपंच पती संस्कृतीवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच ग्रामसभेपूर्वी दवंडी, पत्रके आणि महिला बचत गटांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करावी, ग्रामसभांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग अनिवार्य करावे आणि महिलांचे प्रश्न लेखी स्वरूपात नोंदवून त्यावर ठोस निर्णय घेण्यात यावेत, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

# दुर्बल घटकांसाठी महावितरणची विशेष स्मार्ट योजना

नांदेड/प्रतिनिधी-भारत सरकारच्या प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन व महावितरणच्या वतीने १ किलोवॅटची छतावरील सोलर सिस्टीम योजना (विशेष स्मार्ट योजना-२०२५) नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना अनुदानावर आधरित आहे.

एक किलोवॅट छतावरील सौरऊर्जा प्रणालीस केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान उपलब्ध असणार आहे. महावितरणकडुन राबविण्यात येणाऱ्या या योजनेत सौर प्रणालीसाठी भारतीय बनावटीचे आयईसी प्रमाणित सोलर मॉडयूल्स वापरण्यात येत आहे. पुरवठादारां मार्फत ५ वर्ष देखभाल व दुरुस्ती असणार असून योजनेत भाग घेण्यासाठी राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे. वैध घरगूती वीज जोडणी असणाऱ्या ग्राहकांनाच या योजनेत सहभाग नोंदविता येईल. सौर यंत्रणा बसविण्यासाठी घराच्या छतावर पूरेशी जागा असावी, ग्राहकांने इतर कोणत्याही सौर अनुदानित योजनेचा लाभ घेतलेला नसावा. फक्त् घरगुती ग्राहकच या योजनेसाठी पात्र असतील. मागील १२ महिण्यातील प्रत्येक महिण्यात १०० यूनिटपेक्षा कमी वीज वापर असणारे ग्राहकच योजनेत पात्र ठरतील. दारिद्रय रेषेखालील व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील ग्राहकांना प्राधान्य असणारी ही योजना आहे.वीज बिलांचा भार कमी करणे, सौरऊर्जेतून स्वयंपूर्णता वाढविणे, शिल्लक वीज विकूण ग्राहकांना अतरिक्त् उत्पन्नाच्या संधी प्राप्त् करणे, पर्यावरणपूरक व स्वच्छऊर्जा वापर वाढविणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन हरित विकासाला चालना देण्यासाठी ही योजना महत्वाची आहे.

# 'राजा शिवाजी'ची बॉक्स ऑफिसवर सिंहगर्जना

मुंबई/प्रतिनिधी-रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घालतोय. अनेक नवे सिनेमे येऊनही या ऐतिहासिक सिनेमाची क्रेझ कायम आहे. कोणताही नवा सिनेमा त्याच्या कमाईवर परिणाम करू शकलेला नाही. प्रदर्शित झाल्याच्या पहिल्या दिवसापासूनच या सिनेमानं बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत.

रिलीज होऊन अठरा दिवस उटूनही रितेश देशमुखच्या सिनेमानं इतिहास रचला आहे. 'राजा शिवाजी' सिनेमा आता



मराठी सिनेसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या सिनेमांच्या यादीत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. त्यामुळे या सिनेमाच्या तिसऱ्या सोमवारच्या कमाईकडे सर्वांचंच लक्ष लागलं होतं. रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी' बॉक्स ऑफिसवर राज्य करतोय. या सिनेमानं नव्यानं रिलीज झालेल्या फिल्म्सना आपली मानही वर काढू दिलेली नाही. फिल्म रिलीज झाल्यापासून ते आजपर्यंत या सिनेमानं प्रत्येक दिवसी आपली पकड बॉक्स ऑफिसवर आणखी मजबूत केली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# गॅस वितरणाच्या भोंगळ कारभाराविरोधात नायगावात चक्काजाम

## रिकाम्या टाक्या रस्त्यावर फेकून आंदोलन;एजन्सी कार्यालय बंद असल्याने नागरिक संतप्त

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव शहरातील घरगुती गॅस वितरण व्यवस्थेतील अनागोंदीमुळे सोमवारी नागरिकांचा संताप रस्त्यावर उसळला. डॉ.हेडगेवार चौकात नागरिकांनी रिकाम्या गॅस टाक्या रस्त्यावर ठेवून चक्काजाम आंदोलन छेडले. या आंदोलनामुळे नांदेड-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

गेल्या अनेक दिवसांपासून घरगुती गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. ऑनलाईन बुकींग करून ओटीपी मिळाल्यानंतरही दहा ते पंधरा दिवस सिलेंडर घरपोच मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. विशेष म्हणजे आज दिवसभर संबंधित गॅस एजन्सीचे कार्यालय पूर्णपणे बंद असल्याचे दिसून आले. त्यामुळे बुकींग, केव्हायसी आणि इतर कामांसाठी आलेल्या नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. वारंवार एजन्सीकडे संपर्क साधूनही कोणतेही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला. सिलेंडर मिळत नाही, कार्यालय बंद असते आणि प्रशासनही दुर्लक्ष करत आहे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. अचानक सुरू झालेल्या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतुकीचा खोळंबा झाला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. बिलोलीचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यानंतर तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आला. तसेच नायब तहसीलदार येरावार यांनी घटनास्थळी भेट देत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. संबंधित गॅस एजन्सी विरोधात योग्य कार्यवाही करून वितरण व्यवस्था सुरळीत केली जाईल, असे प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र दिवसभर एजन्सी कार्यालय बंद राहिल्याने आणि सेवा पूर्णपणे ठप्प असल्याने नागरिकांमध्ये प्रशासन व संबंधित एजन्सी विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# श्री रेणुका मातेच्या दर्शन रांगेत मुंबईच्या महिलेची पर्स लंपास

माहूर/प्रतिनिधी-श्री रेणुका माता मंदिर येथे दर्शनासाठी आलेल्या मुंबईतील महिला भाविकेची पर्स अज्ञात महिलेने लंपास केल्याची घटना सोमवार सकाळी घडली. या प्रकारात रोकड, सोन्याचे दागिने व चांदीचे जोडवे असा तब्बल १ लाख ५९ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला असून संबंधित महिला चोरटी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

याबाबत उषा सुधाकर तायडे (वय ५९, रा. डोंबिवली, मुंबई) यांनी माहूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, त्या मुलगी सीमा अशोक पाटील व इतर नातेवाईकांसह माहूर येथे देवीच्या दर्शनासाठी आल्या होत्या. त्यांनी माहूर येथे मुक्काम करून रविवारी पहाटे रेणुका मातेच्या दर्शनासाठी गडावर पायी प्रस्थान केले.सकाळी साडेसातच्या सुमारास दर्शन रांगेत उभ्या असताना त्यांच्या जवळील गोल्डन रंगाची पर्स अचानक गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. सदर पर्समध्ये ५७ हजार रुपयांची रोकड, ५ ग्रॅम व ६ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या तसेच १० ग्रॅम वजनाचे चांदीचे जोडवे असा मौल्यवान ऐवज होता.घटना लक्षात येताच त्यांनी मंदिर परिसरातील सुरक्षा रक्षक महादेव मुंडे यांना माहिती दिली. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली असता, फिकट निळ्या रंगाची साडी नेसलेल्या एका महिलेने गर्दीचा फायदा घेत पर्स चोरल्याचे स्पष्ट दिसून आले. संबंधित महिला मंदिराबाहेर पर्स घेऊन जातानाही फुटेजमध्ये दिसून आली आहे.या प्रकरणी माहूर पोलीस ठाण्यात अज्ञात महिलेविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून असून पोलिसांकडून सीसीटीव्हीच्या आधारे संशयित महिलेचा शोध घेण्यात येत आहे.

# २० मे च्या औषध विक्रेता बंद दरम्यान रुग्णांची गैरसोय होऊ नये;अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन


नांदेड/प्रतिनिधी-अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने देशभरात तसेच राज्यात बेकायदेशीररीत्या इंटरनेट फार्मसीद्वारे होणारी ऑनलाईन औषध विक्री, ई-पोर्टल तसेच जीएसआर ८१७(ई) दि. २८ ऑगस्ट २०१८ आणि कोविड संदर्भातील जीएसआर २२०(ई) दि. २६ मार्च २०२० हे आदेश मागे घेण्याच्या मागणीसाठी २० मे रोजी एक दिवसीय देशव्यापी बंद पुकारला आहे.

या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी नांदेड शहरासह तालुका व ग्रामीण भागातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनला आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही रुग्णाला औषधांच्या उपलब्धतेबाबत अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.तसेच जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नांदेड, नांदेड-वाघाळा महानगर-पालिका आरोग्य विभाग तसेच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनालाही त्यांच्या औषध भांडारात पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे.बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास त्यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८३६९०२७०६८ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.तसेच नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, जेणेकरून संभाव्य गैरसोय टाळता येईल, असेही अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त अ.तु. राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



मरळक येथील महाशक्ती लिंग मल्लिनाथ आश्रम येथे आ.बालाजी कल्याणकर यांनी निधी मंजूर करुन दिल्याचे पत्र अध्यक्ष दासराव हंबर्डे व विश्वस्त मंडळाकडे दिले. यावेळी गंगाधर पाटील सायाळकर, रमेश पाटील ढोकीकर, दत्तात्रय पांडे, शंकर पाटील, सुरेश नांदेडकर यांच्यासह इतर उपस्थित होते.

# नीट पेपर लीक प्रकरणी कठोर कारवाईची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नीट पेपर लीक प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न गंभीर बनल्याचा आरोप करत राष्ट्रीय संविधान बचाव अभियानाच्या वतीने राष्ट्रपतींकडे जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणण्याची तसेच परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नीट, जेईई आणि इतर स्पर्धा परीक्षा खासगी संस्थांमार्फत न घेता थेट शासनाने घ्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. तसेच शिक्षण क्षेत्रातील खासगीकरण धोरणाचा पुनर्विचार करावा, महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती सुरू करावी आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी तातडीने निर्णय घ्यावेत, अशी भूमिका मांडण्यात आली आहे. मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास देशभर आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनावर प्रा. देविदास इंगळे, प्रा.गंगाधर सूर्ये तसेच संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ.बालाजी भांगे यांचे तजिकिस्तान मध्ये विशेष चित्रप्रदर्शन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र सुप्रसिध्द् चित्रकार डॉ. बालाजी भांगे यांच्या चित्रप्रदर्शन-हस्तकला या केलेचा ९ ते १५ मे दरम्यान तजिकिस्तानमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला. कै.गंगाधरराव भांगे, महावितरण मध्ये कारागीर क म्हणून कार्यरत असताना सण २०१८ मध्ये दुःखद निधन. मुळगाव अर्जापूर, ता. बिलोली. देगलूर व मुंबई येथे त्यांचे शिक्षण झाले. ते उच्च विद्याविभूषित असून, निराळी समाजाची जाण असलेले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी पीएचडी सारखे शिक्षण आत्मसात केले. डॉ.बालाजी भांगे यांना समाजाची व संस्कृातीची जाण असून त्यांनी भारताचे नाव बाहेर देशात उज्वल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कला प्रदर्शनात नऊ ते पंधरा मे २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांच्या भारतीय कलेचा गौरव करण्यात आला.कला आणि विज्ञान यांचा अद्भुत संगम साधणाऱ्या डॉ. भांगे यांनी रंगांचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव याचा सखोल अभ्यास करून या विषयात पीएचडी संपादन केली आहे.

# नांदेडात स्मार्ट वीज चोरी; आठ जणांवर पोलीस कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-देय तारखेच्या आत वीज बिल न भरणाऱ्या वीज ग्राहकांचा स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणच्या परस्प्र थकबाकीदार ग्राहकांनी आपले वीजबिल न भरता सर्व्हिस वायरच्या माध्यमातून थेट वीज जोडणी घेऊन चोरी केल्याचे प्रकार नांदेड शहरात आढळून आले. त्याप्रकरणी गुरुवारी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आठ वीज चोरांविरुध्द् गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील नुसरत सुलताना मिरजा अन्व्र आली बेग रा.फतेहबुरुज, फेरोजखान इस्माईल खान रा.हिलालनगर, आसिफ अब्दुल हाजी दिवाणी जवळ, सुलताना बेगम मोहंमद खालेद रा. रज्जाक कॉलनी, परमार शिवनसिंघ चुडमनसिंघ रा. गाडीपूरा, सोफया बेगम अब्दुल मजीद रा. मोमीणपूरा, रामा रामजी धडके रा. शांतीनगर व बबीता नागेश रच्छेवार रा.विणकर कॉलनी यांनी त्यांचा थकबाकी पोटी वीजपूरवठा खंडीत केलेला असताना त्यांनी बिल न भरताच भेट सर्व्हिस वायर टाकून अनाधिकृतपणे वीज वापर केल्याचे आढळून आले. त्यांच्याविरुध्द महावितरणच्या फिर्यादीनुसार गुरुवार दि. १४ मे २०२६ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

# भोंदू बाबांच्या युगात साईनाथ महाराजांसारखे युगपुरुष दुर्मिळ-तृप्तीताई देसाई

माहूर/प्रतिनिधी-श्री आनंद दत्तधाम आश्रम, माहूरगड येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धोंडे जेवण महाअन्नदान महापंगत चूल बंद कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका अध्यक्षा तृप्ती ताई देसाई यांनी उपस्थित राहून राष्ट्रसंत द. भ.प. साईनाथ महाराज वसमतकर यांच्या सामाजिक व आध्यात्मिक कार्याचे कौतुक केले.

यावेळी बोलताना तृप्ती ताई देसाई म्हणाल्या की, आजच्या काळात समाजात अनेक भोंदू बाबांचे प्रस्थ वाढत असताना साईनाथ महाराजांसारखे समाजहित जपणारे, लोकसेवा करणारे आणि महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य करणारे युगपुरुष दुर्मिळ आहेत. त्यांच्या सप्तसूत्री उपक्रमातून राज्यभर महिलांना नवी दिशा मिळत असून त्यांचे कार्य खरोखर प्रेरणादायी आहे. समाजसेवा, अध्यात्म आणि अन्नदान यांचा सुंदर संगम आनंद दत्तधाम आश्रमात पाहायला मिळत आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही साईनाथ महाराज यांच्या पुढाकारातून १७ मे ते १५ जून दरम्यान महिनाभर चूल बंद महाअन्नदान महापंगत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून राज्यभरातून येणारे भाविक या महाप्रसादाचा लाभ घेणार आहेत. कार्यक्रमास मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत राठोड, शिवसेना ऊ.बा.ठा. नांदेड जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी, कैलास गोरठेकर, नानाभाऊ गोरठेकर, नंदकुमार संतान, जवाहरलाल जयस्वाल,अनिल वाघमारे, दीपक कान्नव, भाऊराव पाटील हडसनीकर, रमेश बद्दीवार, अनिल कोरटकर, प्रल्हाद देवडे, वसंतराव कपाटे, दिगंबर जोशी,पुंडलिक हुंबे, सीताराम पाटील, वटपलवार, पी. जी. रुद्रवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी तृप्ती ताई देसाई यांना भेटण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शिक्षक परिषदेचे माहूर तालुकाध्यक्ष शेषराव पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# प्रा.पी.डी.गोणारकर यांना पीएच.डी पदवी प्रदान

धर्माबाद/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत सामाजिक प्र-शाळेत दि.१५ मे रोजी पीएच.डी अंतिम वायवा यशस्वीरित्या पार पडला. यामध्ये संशोधक प्रा.पी.डी. गोणारकर यांनी परीक्षकांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देत आपले संशोधन प्रभावीपणे सादर केले. या वायवासाठी चेअरमन म्हणून डॉ. शालिनी कदम यांनी काम पाहिले, तर बाह्य परीक्षक म्हणून डॉ. विजय तुंटे उपस्थित होते. प्रा.पी.डी. गोणारकर यांनी डॉ. कविता सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पूर्ण केले.यावेळी डॉ. मनोहर चासकर, डॉ. अशोक महाजन, डॉ. राहूल नरंगलकर, डॉ. मारोती गायकवाड, डॉ. संतोष शेंबाळे, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण निदानकार, अविनाश पिंगळे, नरेंद्र रेड्डी तसेच प्रा.भास्कर पवार यांनी प्रा.पी.डी. गोणारकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रा.पी. डी.गोणारकर यांनी मानवी हक्क व मराठवाड्यातील मातंग समाजाची परिस्थिती:एक चिकित्सक अभ्यास या विषयावर सखोल व परिश्रमपूर्वक संशोधन केले आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२०/२०२६
सुरेश वि.निरंक

अर्जदार : १. सुरेश पि.टोपाजी काकरे, वय : ४५ वर्षे धंदा : मजुरी रा.घर क्र.९०, न्यु हिस्सापूर वाघी रोड, नांदेड, २. गोविंद पि. टोपाजी कोकरे वय : ४९ वर्षे धंदा : मजुरी रा.बलवाडकर भगवान नाथोबा निअर चाकणकर माळा सिरीयल क्रं.१८, प्रकृती बिल्डींग, जवळ बालेवाडी रोड,पुणे, ३. लक्ष्मीबाई भ्र.बबन कोकरे वय : ५२ वर्षे धंदा : घरकाम, ३/१ प्रतिक्षा पि.बबन काकरे वय : २३ वर्षे धंदा : घरकाम रा.देगावचाळ भयासाहेब आंबेडकरनगर,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत जनाबाई भ्र.टोपाजी काकरे यांचे वारस आहेत. मयत जनाबाई भ्र.टोपाजी काकरे यांचा २१/०२/२००७ रोजी मृत्यु झाला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २२/०६/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | "आदेशावरुन" |
| **कनिष्ठ लिपीक** | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | **सहा.अधिक्षक** |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर संपन्न

कंधार/प्रतिनिधी-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नांदेड आणि श्री संत नामदेव महाराज संस्थान उमरज यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक धोरणाअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन श्री संत एकनाथ नामदेव महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले.या आरोग्य शिबिरात कंधार येथील तज्ञ डॉक्टर डॉ. स्वप्निल रणदिवे, डॉ. ज्ञानेश्वर केंद्रे, डॉ. गुडमेवार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र कुरळा येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन, योग प्रशिक्षण, रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, वजन तपासणी, महिलांसाठी स्त्रीरोग तपासणी, हाडांची तपासणी, ईसीजी, अस्थमा-दमा तपासणी तसेच मोफत औषध वितरण करण्यात आले.

# श्री महालक्ष्मी महिला शेतकरी गटाकडून २०० लिटर दशपर्णी अर्काची निर्मिती

नांदेड/प्रतिनिधी-सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील मौजे नांदुसा येथील श्री महालक्ष्मी महिला शेतकरी गटाने एकत्र येत इर्जिक पद्धतीने २०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला.

यासाठी लागणाऱ्या दहा प्रकारच्या वनस्पतींचा पाला गोळा करून त्याचे कुटण व प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक महिला सदस्यांनी प्रत्यक्ष सहभागातून केले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी तथा मेंटॉर वसंत जारीकोटे यांनी दशपर्णी अर्क तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया उपस्थित महिलांना समजावून सांगितली. पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक विशाल इंगळे यांनी जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मृदा परीक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. खतांच्या मात्रा परीक्षण अहवालानुसार योग्य पद्धतीने देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी तथा मेंटॉर कैलास पेरके यांनी गटामार्फत पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच त्यासाठीच्या गुणांकन पद्धतीची माहिती दिली. उमेदचे मेंटॉर कँदुरके यांनी प्रास्ताविकातून बीबीएफ पेरणी व उताराला आडवी मशागत याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमात गटातील सर्व महिला सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एसओपी पद्धतीचा अवलंब करून सहकार्याने गटशेती व स्मार्ट शेती करण्याचा निर्धार यावेळी सदस्यांनी व्यक्त केला. तसेच स्पर्धेसाठी पूर्ण तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी गटाच्या निमंत्रक श्रीमती माया जनकवाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाबाराव जनकवाडे, मन्मथ जनकवाडे, शिवदास जनकवाडे, दैवशाला डांगे यांच्यासह गटातील सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

# सोन्याच्या दरात पुन्हा वाढ तर चांदी उतरली

मुंबई/प्रतिनिधी- देशातील सराफा आणि कमोडिटी बाजारात आज पुन्हा एकदा सोन्याच्या दरात वाढ दिसून आली, तर चांदीच्या किमतीत घसरण नोंदवण्यात आली. सोन्या-चांदीच्या दरातील चढ-उतारामुळे गुंतवणूकदार संभ्रमात पडले आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारातील हालचाली आणि देशांतर्गत मागणीचा परिणाम सोने-चांदीच्या दरावर होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ग्राहक आणि गुंतवणूकदार दोघेही सध्या बाजारातील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर जून डिलिव्हरीसाठीचे सोने आज ०.१७ टक्क्यांनी वाढून सुमारे १ लाख ५९ हजार ६७४ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचले. व्यवहाराच्या सुरुवातीलाच सोन्याने १ लाख ५९ हजार ८९९ रुपयांचा उच्चांक गाठला होता. मागील सत्राच्या तुलनेत सोन्यात किरकोळ तेजी दिसून आली. याउलट, चांदीच्या किमतीत आज नरमाई पाहायला मिळाली. जुलै डिलिव्हरीच्या चांदीत सुमारे ०.६५ टक्क्यांची घसरण झाली असून, प्रति किलो दर जवळपास १,८०० रुपयांनी कमी झाले. त्यामुळे चांदीचा भाव २ लाख ७५ हजार ८२४ रुपये प्रति किलोवर आला. सोमवारी हा दर २ लाख ७५ हजार ६५१ रुपये होता.आर्थिक तज्ज्ञांच्या मते, जागतिक स्तरावर वाढती महागाई, डॉलरमधील चढ-उतार आणि भू-राजकीय परिस्थिती यामुळे सोन्याच्या दराला दीर्घकालीन आधार मिळत आहे. त्यामुळे पुढील काळात सोन्याच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मात्र, अल्पकालीन कालावधीत बाजारात अस्थिरता कायम राहू शकते. त्यामुळे एकाच वेळी मोठी गुंतवणूक करण्याऐवजी दर कमी झाल्यावर टप्प्याटप्प्याने खरेदी करणे अधिक फायदेशीर ठरू शकते, असा सल्ला बाजार विश्लेषकांनी दिला आहे.

# प्रवाशांना वाऱ्यावर सोडून नागपूर-किनवट बस भूर्रर...दामटवली

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक-वाहकांची मनमानी...?

माहूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवेला हरताळ फसणारी धक्कादायक घटना रविवारी (दि.१८ मे) रात्री माहूर बसस्थानकावर घडली. किनवट आगाराची नागपूर-किनवट बस बसस्थानकावर उपस्थित असलेल्या तब्बल २० ते २५ प्रवाशांना न घेताच थेट निघून गेल्याने संतप्त प्रवाशांनी एस. टी. प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, संबंधित बसने स्थानकावरील वाहतूक नियंत्रण कक्षात नियमानुसार नोंदच केली नसल्याचे उघड झाल्याने हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ८:१० वाजण्याच्या सुमारास माहूर बसस्थानकावर हदगाव आगाराची बस व माहूर-लातूर बस उभी होती. त्यावेळी किनवट मार्गावर जाण्यासाठी महिला व पुरुष प्रवासी नागपूर-किनवट बसची वाट पाहत होते. दरम्यान संबंधित बस स्थानक परिसरात आली; मात्र नियमानुसार थांबा न घेता केवळ फेरी मारून प्रवाशांना न घेताच पुढे निघून गेली.हा प्रकार लक्षात येताच प्रवाशांनी मोठ्याने आवाज देत बस थांबविण्याचा प्रयत्न केला. काही प्रवासी बसच्या मागे धावत गेल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मात्र चालकाने बस न थांबवता थेट मार्गस्थ केल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली. महिला, ज्येष्ठ नागरिक व दूरवर जाणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल झाल्याचे संतप्त प्रवाशांनी सांगितले. संतप्त प्रवाशांनी बसचा क्रमांक व चालक-वाहकाची माहिती जाणून घेण्यासाठी वाहतूक नियंत्रण कक्षात चौकशी केली असता संबंधित बसची कोणतीही इंट्री नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.आरायवल-डिपाचर नोंद वही मध्ये नोंद नसणे, नियंत्रण कक्षाला माहिती न देणे आणि प्रवाशांना सेवा नाकारत बस निघून जाणे हे एसटी महामंडळाच्या नियमांचे सरळ उल्लंघन असल्याचे बोलले जातं आहे. या घटनेनंतर संतप्त प्रवाशांनी विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड विभाग, विभागीय वाहतूक अधिकारी, आगार व्यवस्थापक किनवट तसेच माहूर स्थानक प्रमुख यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित चालक-वाहकावर कठोर विभागीय कारवाई करण्याची मागणी प्रवासी वर्गातून जोर धरत आहे. प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य मिरवणाऱ्या एसटी सेवेनेच जर प्रवाशांना वाऱ्यावर सोडण्याचे काम केले, तर सामान्य नागरिकांनी विश्वास कोणावर ठेवायचा..? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.




नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कार्यवाही करावी, पेट्रोल-डिझेल आणि खाद्यतेलाची दरवाढ कमी करुन शेतकऱ्यांच्या कांद्याला रास्त भाव देण्यात यावा. यासह विविध मागण्यांसाठी काँग्रेसच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, शहर जिल्हाध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेश गायकवाड, डॉ.रेखा चव्हाण, ज्योती कदम, माजी उपमहापौर अब्दुल गफार, एकनाथ मोरे, श्रावण रॅपनवाड, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, रमेश गोडबोले, ॲड.सुरेंद्र घोडजकर, गंगाधर सोंडारे, बालाजी चव्हाण, सुरेश हटकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# किनवटमध्ये २४ रोजी सामूहिक विवाह सोहळा

## अजिंक्य सेवाभावी संस्थेचा वीस वर्षांचा समाजसेवेचा वसा कायम

किनवट/प्रतिनिधी-अजिंक्य सेवाभावी संस्थेद्वारा सामूहिक विवाह मेळावा २४ मे रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न होत आहे. किनवट येथील कलावती गार्डनमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन केले आहे. सलग वीस वर्षांपासून या संस्थेने बाराशाहून अधिक नवदाम्पत्यांना विवाहबद्ध करण्याचा इतिहास रचला आहे.नवदाम्पत्यांना विवाहबद्ध करून आशीर्वाद देण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहाण्याचे स्वागताध्यक्ष ज्योतिबा खराटे, निमंत्रक करण एंड्रलवार आणि संयोजक निखिल वाघमारे यांच्यासह अजिंक्य सेवाभावी संस्थेच्या वतीने आवाहन केले आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठीच नव्हेतर आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्यांसाठी सुद्धा अशी सामूहिक विवाह मेळावे काळाची गरज बनली आहे. अनाठायी खर्चाला लगाम आणि वेळेची बचत अशा मेळाव्यांमुळे होते. या मंगलप्रसंगी नवदांम्पत्यांना वैवाहिक जीवनासाठी शुभाशीर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याने जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन केले आहे.प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती बेबीताई प्रदीप नाईक, नगराध्यक्ष सुजाताताई विनोद येंड्रलवार, ॲड.सुभाष ताजने, दत्ता कसबे तसेच मुन्ना खान यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते रात्रंदिवस मेहनत घेत असून नियोजनाची जबाबदारी माजी नगराध्यक्ष अरुण आळणे यांनी स्वीकारली आहे. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष ज्योतिबा खराटे, नियंत्रक करण येंडूलवार अध्यक्ष अमोल भवरे तर उपाध्यक्ष म्हणून गोलू आढागळे जबाबदारी सांभाळत आहेत. विवाह मंडप, भोजन व्यवस्था आणि इतर तांत्रिक बाबींचे नियोजन अंतिम टप्प्यात असून हा सोहळा अविस्मरणीय करण्यासाठी संस्थेची संपूर्ण टीम सज्ज झाली आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून नवदांपत्यांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन माजी नगराध्यक्ष अरुण आळणे व अजिंक्य सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नियंत्रण कक्ष स्थापन

नांदेड/प्रतिनिधी-ऑल इंडिया ऑर्गनायजेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट यांच्या वतीने २० मे २०२६ रोजी एक दिवसाचा बंद पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी औषध व अन्न प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाने जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

नियंत्रण कक्षासाठी सहाय्यक आयुक्त (औषधे) अ.तु. राठोड (मो. ८३६९०२७०६८), अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती शि.व. श्रीरामे (मो. ८०८०१०८८१८) तसेच लिपिक टंकलेखक श्रीमती अ.रा. पाटील (मो. ८४४६३१८९८३) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास नागरिकांनी वरील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.तसेच संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, असेही अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

पान १ वरुन

### शिवराज मोटेगावकर...

धागेदोरे समोर आले आहेत. त्यानंतर आर्थिक गैरव्यवहार, मनी लॉन्डरिंग किँवा बेकायदेशीर निधी हस्तांतरण झाले का, याची प्राथमिक पडताळणी सुरू असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, मोटेगावकर यांच्या मुलाने यावर्षी नीट परीक्षा दिल्याची माहिती समोर आल्यानंतर या प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले आहे. मुलाच्या वैद्यकीय शिक्षणासाठी प्रश्नपत्रिका मिळवण्याचा प्रयत्न झाला का, याचाही तपास सीबीआयकडून केला जात असल्याची माहिती आहे.

# हदगाव शहराच्या मुख्य प्रवेश मार्गावर दुभाजक नसल्याने अपघातांचा धोका वाढला

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील सार्वजनिक वाचनालय ते उमरखेड टी-पॉईंट दरम्यान काही वर्षांपूर्वी मोठ्या खर्चातून नव्या मुख्य प्रवेश रस्त्याचे बांधकाम करण्यात आले. मात्र, या रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक (डिव्हायडर) उभारण्यात आलेला नसल्याने नागरिक, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या रस्त्यावर सतत अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून अनेक किरकोळ दुर्घटनाही झाल्याची माहिती समोर येत आहे.

चार वर्षांपूर्वी या रस्त्याचे रुंदीकरण आणि डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले. रस्ता अत्यंत रुंद करण्यात आला असला तरी मध्यभागी कोणताही दुभाजक नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावत आहेत. शिवाय, आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकरची सुविधाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे या मार्गावर दररोज जीव मुठीत धरून नागरिकांना प्रवास करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.या संदर्भात जागरूक नागरिक, पत्रकार तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित विभागाकडे वारंवार निवेदने देऊन दुभाजक उभारण्याची मागणी केली होती. तत्कालीन आमदारांनाही याबाबत अवगत करण्यात आले होते. मात्र, या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. काही व्यापाऱ्यांनी दुभाजक उभारल्यास व्यापारावर परिणाम होईल, अशी भूमिका घेतल्याची चर्चा त्यावेळी शहरात रंगली होती. परिणामी आजही हा महत्त्वाचा रस्ता कोणत्याही सुरक्षा उपाययोजनांशिवाय सुरू आहे.विशेष म्हणजे या मुख्य मार्गावर अनेक मोठी व्यापारी प्रतिष्ठाने, शाळा, महाविद्यालये, तहसील कार्यालय, बसस्थानक तसेच राष्ट्रीयीकृत बँका आहेत. त्यामुळे दिवसभर विद्यार्थ्यांसह नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही वर्षांपूर्वी याच मार्गावर शालेय विद्यार्थ्यांशी संबंधित अपघात घडल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये आहे. उमरखेड टी-पॉईंटपासून शहरातून जाणाऱ्या या रस्त्याचे काम पूर्ण होऊन तीन ते चार वर्षांचा कालावधी लोटला असला तरी हा रस्ता राज्य महामार्ग आहे की राष्ट्रीय महामार्ग, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध होत नाही. विशेष म्हणजे रस्त्याच्या कामाचा तपशील दर्शविणारा फलक किँवा माहितीफलक अद्यापही लावण्यात आलेला नाही.

### आ.कोहळीकर यांनी लक्ष देण्याची अपेक्षा...!

हदगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनाही या समस्येची माहिती असल्याचे सांगितले जात आहे. नागरिकांकडून आता नव्या आमदारांनी या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन दुभाजक, स्पीड ब्रेकर आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# स्वतंत्र आयपीएस अधिकारी असूनही नायगावात अवैध धंदे तेजीत

## चोऱ्यांच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव पोलीस स्टेशनला स्वतंत्र आयपीएस अधिकारी नियुक्त करण्यात आले असूनही शहरातील अवैध धंदे, गुटखा विक्री, वाढत्या चोऱ्या आणि वाहतुकीतील अनागोंदीवर प्रभावी नियंत्रण दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलीस यंत्रणेकडे अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध असतानाही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नायगाव शहर व परिसरात खुलेआम गुटखा विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अनेक भागांत सर्रास गुटखा उपलब्ध होत असून संबंधितांवर कठोर कारवाई होत नसल्याने अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.त्याचबरोबर नायगाव पोलीस स्टेशन हद्दीत चोरीच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कोलंबी गावातील धाडसी घरफोडीच्या घटनेनंतर परिसरात चोऱ्यांच्या घटनांबाबत चिंता अधिक वाढली आहे. मोटारसायकल चोरीच्या घटनाही वाढत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झालेली दिसून येत आहे. प्रमुख चौकांमध्ये वारंवार वाहतूक कोंडी होत असून अतिक्रमण, रस्त्यावर उभी राहणारी वाहने आणि नियंत्रणाच्या अभावामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र या गंभीर प्रश्नांवर पोलीस प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.विशेष म्हणजे नायगाव पोलीस स्टेशनला स्वतंत्र आयपीएस अधिकारी तसेच मोठा कर्मचारी वर्ग उपलब्ध असतानाही अवैध धंदे, चोरी आणि वाहतूक समस्यांवर प्रभावी लगाम लागत नसल्याने जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.ज्या अधिकाऱ्यांना एक पोलीस स्टेशन प्रभावीपणे सांभाळता येत नाही, ते भविष्यात मोठी जबाबदारी कशी पेलणार? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.नागरिकांनी तातडीने विशेष मोहीम राबवून गुटखा विक्री बंद करावी, चोरीच्या घटनांवर आळा घालावा, रात्रीची गस्त वाढवावी तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

पान १ वरुन

### औषधी विक्रेत्यांचा...

व्यवसाय करत असल्याचा आरोप केमिस्ट संघटनांनी केला आहे.तसेच प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री, बनावट प्रिस्क्रिप्शनचा वापर आणि अँटिबायोटिक्सच्या गैरवापराचा धोका वाढत असल्याची चिंताही व्यक्त करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे छोट्या मेडिकल दुकानांचा व्यवसाय धोक्यात आल्याचा दावा औषध विक्रेत्यांनी केला आहे.दरम्यान, सर्व मेडिकल दुकाने पूर्णपणे बंद राहण्याची शक्यता कमी असल्याचे समोर आले आहे. काही राज्यांतील केमिस्ट संघटनांनी बंदपासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याने अनेक ठिकाणी औषध दुकाने सुरू राहू शकतात. मात्र छोट्या व स्वतंत्र मेडिकल दुकानांवर बंदचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.रुग्णालयांशी संलग्न मेडिकल स्टोअर्स, सरकारी रुग्णालयांतील औषध केंद्रे, २४ तास सुरू असलेली मेडिकल दुकाने तसेच आपत्कालीन औषध सेवा सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती संघटनांकडून देण्यात आली आहे. काही भागांतील जनऔषधी केंद्रेदेखील सुरू राहण्याची शक्यता आहे.

### पेट्रोल-डिझेलच्या दरात...

डिझेलचा दर ९२.९९ इतका असून महाराष्ट्राच्या तुलनेत तेथील नागरिकांना काहीसा दिलासा मिळत आहे. इंधन दरवाढीचा थेट परिणाम वाहतूक, कृषी, बाजारपेठ आणि दैनंदिन जीवनावर होणार असल्याने महागाई आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खासगी वाहनधारकांसोबतच मालवाहतूक, बस सेवा आणि शेती क्षेत्रालाही या दरवाढीचा फटका बसणार आहे.

### नांदेडसह मराठवाडा...

ऊन कायम असून, सायंकाळी काही भागांत ढगाळ वातावरण तयार होत आहे.उष्माघाताचा धोका लक्षात घेता नागरिकांनी पुरेसे पाणी पिणे, हलका आहार घेणे, डोक्यावर टोपी किँवा कापड वापरणे आणि लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

### 'हागणदारी मुक्त गाव' ही...

केवळ नावापुरती न राहता, ती प्रत्यक्षात कार्यरत असणे गरजेचे आहे सध्या ही पथके गायब आहेत. यासंदर्भात पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधला असता, कोणतीही ठोस माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे अशी पथके प्रत्यक्षात स्थापन झाली आहेत की नाहीत, असा संशयास्पद प्रश्न उपस्थित होत आहे.नांदेड जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वच्छता अभियानाबाबत विशेष मोहीम केव्हा राबवणार?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशसानाच्या ढिसाळ कारभारामुळे या मोहिमेला गती मिळत नाही. वरिष्ठांनी याकडे त्वरित लक्ष देवून गुड मॉर्निंग पथक स्थापन करुन उघड्यावर शौच करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची गरज आहे.

# जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आगामी निवडणुकीसाठी विविध पदांच्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, मुख्य सचिव, सहसचिव, संघटक सचिव तसेच कार्यकारिणी सदस्य पदांसाठी उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत.

अध्यक्षपदासाठी विश्वम मारोतीराव सयपलवार आणि संजय गुलाबराव भोंटे यांच्यात थेट लढत होणार आहे. तसेच शहर व ग्रामीण भागातील उपाध्यक्ष पदासाठीही उमेदवारांची निवड निश्चित झाली आहे.मुख्य सचिव पदासाठी कृष्णा शिवलिंगप्पा कुरुगे आणि अनिलकुमार रामकिशन चौधरी यांची नावे अंतिम यादीत आहेत. याशिवाय विविध विभागांतील कार्यकारिणी सदस्य पदांसाठी अनेक उमेदवार रिंगणात उतरले आहेत. निवडणुकीमुळे जिल्ह्यातील औषध विक्रेते आणि केमिस्ट व्यावसायिकांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील काळात प्रचाराला वेग येण्याची शक्यता आहे. या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्यातील औषध व्यावसायिकांचे लक्ष लागले आहे.

**नांदेड**-उन्हाच्या उकाड्याने नागरिक हैराण झाले असतांना नंदीग्राम सोसायटी भागात उच्च-कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्याने नागरिकांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रकार गेल्या महिन्या - भरापासून सुरु आहे. महावितरणने तात्काळ याकडे लक्ष देवून नियमित सुरळीत वीज पुरवठा करण्याची मागणी होत आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४